**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर**
मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, ई ब्लॉक, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर-४१३००१
दुरध्वनी क्रं.०२१७-२६२९७४९ ईमेल-ddr_spr@rediffmail.com

जा.क्र. पणन/क-६/कृउबासअकलूज/१२(१)/७८१/२०२१ दिनांक- १०/०२/२०२१

प्रति,
मा. विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

विषय :- कृषि उत्पन्न बाजार समिती (पेट्रोल पंप लगत) अकलूज येथील गाळे-८ चे बांधकाम खर्चाच कलम १२ (१) ला अनुसरून मान्यता देणेबाबत.

संदर्भ:- १. सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर यांचे कडील प्रस्ताव क्र.६२२ दिनांक १७/१२/२०२०.
२. या कार्यालयाचे जा.क्र.६९० दि.५/०२/२०२१ रोजीचे पत्र.
३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज ता.माळशिरस यांचेकडील दिनांक २७/०१/२०२१ रोजीचा स्थळपाहणी अहवाल.

कृपया उक्त विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- उक्त संदर्भान्वये, विषयांकीत प्रकरणी कृषि उत्पन्न बाजार समिती अकलूज यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती (पेट्रोल पंप लगत) अकलूज येथील गाळे-८ चे बांधकाम खर्चाच कलम १२ (१) ला अनुसरून मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयामार्फत आपल्या कार्यालयास सादर केलाआहे. सदर बाजार समितीच्या दि.२९/०९/२०२० रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये ठराव क्र.०८ अन्वये ठराव मंजुर करुन ठरावासोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहे.

सदर प्रस्तावाची छाननी केली असता प्रस्तावा सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दि.२९/०९/२०२० रोजीच्या ठराव क्र.०८ च्या लागुपुरता उतारा.
२. नियोजित बांधकामाचे चे डिझाईन
३. परिशिष्ठ ३ प्रमाणे प्रपत्र अ, तांत्रिक निकष व ब प्रमाणे आर्थीक निकष दाखविणारे तक्ते
४. मागिल तीन वर्षातील उत्पन्न खर्च वाढावा पत्रक, बा.फी, शा.दे.फी तक्ता, बजेट तरतुद तक्ता
५. प्लॅन व इस्टीमेट रक्कम रु.४४,०१,९२०/-
६. मंजूर लेआऊट प्रत
७. आर्थीक पत्रके
८. एस्टीमेट, लिड चार्ट रिपोर्ट व आर्किटेक्ट यांचा दाखला.
९. सहाय्यक निबंधक, सह.संस्था, अकलूज यांचा दिनांक २७/०१/२०२१ रोजीचा स्थळपाहणी अहवाल.

कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज यांनी संदर्भ क्र.१ अन्वये सादर केलेल्या कलम १२(१) च्या प्रस्तावाची अंदाजीत रक्कम रु. ४४,०१,९२०/- इतकी असल्याने मा. पणन संचालक, म.रा. पुणे यांनी संदर्भ क्र.४ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार रु.२५ लाख ते रू. ५० लाख पर्यतचे स्थावर मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार आपले कार्यालयास असल्याने, कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला मुळ प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव आपले कार्यालयाकडे सविनय सादर करण्यात येत आहे.

सोबत- मुळ प्रस्ताव

(कुंदन भोळे)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, सोलापूर

प्रत -सभापती / सचिव,कृषी उत्पन्न बाजार समिती, अकलूज